# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०३/२०२६ (सोमवार )**

## घरफोडीचा गुन्हा उघड, १ आरोपी अटक, ०१ लाख ११ हजार ९०० रूपयाचा मुद्देमाल जप्त , स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक १३/०८/२०२५ रोजी फिर्यादी लिलाधर नत्थुजी गणविर, वय ४० वर्ष, रा. नवेगाव (सिर्सी) पुर्नवसन ता. कुही, जि. नागपूर यांनी पोलीस स्टेशन वेलतूर येथे तक्रार दिली की, दिनांक १३/०८/२०२५ रोजी फिर्यादी आणि फिर्यादीची पत्नी दोघेही घराला कुलुप लावुन कामानिमीत्त्य बाहेर गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादीच्या घराच्या दरवाज्याचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करून दुपारी ०२.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान घरातील बेडरूममध्ये असलेले लोखंडी कपाटातुन फिर्यादीच्या पत्नीचे सोन्याचे दागिने व नगदी ५०००/—रूपये असा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वेलतूर येथे कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे. वेलतूर पोलीस सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सुध्दा समांतर तपास सुरू केला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्य तांत्रिक पुरावे , गुप्तबातमीदाराची माहिती तसेच अंगुलीमुद्रा विभागाच्या माहीतीवरून सदर गुन्हा **आरोपी नामे मो. मुजाबील अब्दुल तवाब, वय २९ वर्षे, रा. बंदे आनंद कौशल्य नगर, नागपूर यानेच केल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली होती. दिनांक १६/०३/२०२६ रोजी आरोपीचा शोध घेऊन त्यास नागपुर येथुन ताब्यात घेतले. आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने कौशल्यपुर्ण विचारपुस**

**केली असता त्याने** पोलीस स्टेशन वेलतूर परिसरात घरफोडी केल्याचे कबुल केले. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयात चोरीस गेलेले सोन्याचे दागिने किंमती १,०६,९००/— रूपये, नगदी ५०००/—रूपये असा एकुण १,११,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **आरोपीस अटक करण्यात आली आहे.**



**अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद,**
**चालक आणि मालक दोन्ही आरोपी अटक**
**टिप्पर,मोटर सायकल सह २१ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त**
**अरोली पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन आरोली** :— दिनांक १५/०३/२०२६ रोजी अरोली पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मसला कडुन निमखेडा कडे अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक करून घेवुन जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी तुमान शेतशिवाराजवळील शिवाजी नगर बसस्टॉप जवळ नाकाबंदी केली असता एक टिप्पर क्रमांक एम एच ४० बी एल २८६८ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक नितीन गणेश सोनेकर, वय २९ वर्षे, रा. भानेगाव,ता सावनेर, जि नागपुर** हा मिळुन आला. त्याला वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक निनाद गोविंदराव रेवतकर,**

**वय ३७ वर्षे, रा. भिलगाव** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **तसेच वाहन मालक हा त्याच्या कडील हिरो मोटर सायकल क्रमांक एम एच ४९ सी यु ४०६१ ने रेती चोरीच्या टिप्पर च्या समोर समोर राहुन चालकाला माहीती देत असल्याची माहीती समजली. पोलीसांनी तात्काळ वाहन मलकाला सुध्दा ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी पंचासमक्ष एक टिप्पर क्रमांक एम एच ४० बी एल २८६८ त्यामधील ६ ब्रास रेती, हिरो मोटर सायकल क्रमांक एम एच ४९ सी यु ४०६१,दोन ॲड्रॉईड फोन असा एकुण किमती २१,१०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.**



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद दोन वाहनासह ०७ लाख १२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त ३ आरोपी अटक, बेला पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक १६/०३/२०२६ रोजी बेला पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा भीवी झमकोली शिवार येथे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस मौजा भीवी झमकोली शिवार येथे गेले असता दोन ट्रॅक्टर क्र. १) एम एच २७/एल ८९६१ व त्याला जोडुन असलेली ट्रॉली क्र. एम एच ३४/ए पी २८५९ २) ट्रॅक्टर मुंडा क्र. एम एच ४०/एल २१०८ व ट्रॉली क्र. एम एच ४०/बी जे ८३४२ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रॅक्टर क्र. १) चा **चालक नामे १) आर्यन अशोक देशमुख, वय १९ वर्षे** ट्रॅक्टर क्र. २) चा **चालक नामे संदीप अशोक नागपुरे, वय ३१ वर्षे यांना वाहन मालकाबाबत** विचारपुस केली असता **आरोपी क्र. ३) अनिल धनराज देहाडे, वय ३९ वर्षे, तीनही रा. मीजिरी, तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर** याचे सांगणेवरून अवैधरित्या रेती वाहून नेत असल्याचे सांगितले. पोलीसांनी दोन्ही चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद दोन्ही वाहने, दोन्ही वाहनात प्रत्येकी १ ब्रास** रेती अशी एकुण ०२ ब्रास रेती असा ७,१२,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी आरोपीतांविरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं सहकलम ४७(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील तिनही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



**अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद**

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक १५/०३/२०२६ रोजी मौदा पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता माथनी बोरगाव परिसरात **आरोपी नामे राजकुमार लक्ष्मण लिल्हारे, वय ३५ वर्ष, रा. नोसा, ता. खैरलांजी जि. बालाघाट** हा अंधारात आपले अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्याची विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक १५/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे युवराज गुलाब नान्हे, वय ४२ वर्ष, रा. नवेगाव देशमुख याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे पुरुषोत्तम बापुराव धार्मीक, वय ५८ वर्ष, रा. लांबटपुरा खापा, ता. सावनेर, जि. नागपूर याचे वर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे नरेंद्र दसन मरस्कोल्हे, वय १९ वर्ष, रा. सायवाडा, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे शरद रामचंद्र हिरुडकर, वय ४० वर्षे, रा.बेलोना, तह. नरखेड याचे वर एक गुन्हा नोंद, अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०५ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ९०० मिली देशी दारू असा एकुण १४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने